४ जुलै महिन्यापासून विद्यार्थ्यांना दरमहा धनादेशाद्वारे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदान करणे.

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | ऑगस्ट | १ | भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परीक्षा फी, व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणा-या वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता इत्यादीबाबत प्राप्त अर्ज मंजूर करुन ते अंतिम करणे. |
| ६ | सप्टेंबर | १ | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयाकडे अंतिम अनुदान निर्धारणासाठी प्रस्ताव पाठविणे. |
| ७ | ऑक्टोबर | १ | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी अंतिम अनुदान निर्धारण करुन अग्रीम दिलेल्या रकमेचे समायोजन करणे. त्यानुसार अतिरिक्त रक्कम (देय रक्कम) अनुज्ञेय ठरत असेल तर ती रक्कम मंजूर करुन महाविद्यालयास अदा करणे आणि वसूलीपात्र रक्कम असल्यास महाविद्यालयाने अशी रक्कम चलनाद्वारे ३१ मार्च पूर्वी भरणे. |
| ८ | नोव्हेंबर | १ | महाविद्यालयांनी पुढील वर्षाच्या आवश्यक त्या स्टेशनरीची / अर्जाची मागणी करणे |
| ९ | डिसेंबर व जानेवारी | १ | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयाच्या तपासणीसाठी सर्व अभिलेखे तयार ठेवणे. |
| १० | फेब्रुवारी | १ | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी अर्जाच्या छपाईबाबतची कार्यवाही करणे. |
| ११ | मार्च | १ | सर्व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना अंतिम भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क दिल्याबाबतची खात्री करणे. |
| | | २ | दिलेल्या अग्रीमातून विद्यार्थ्यांची परीक्षा फी परस्पर विद्यापीठ / मंडळाकडे जमा करणे. |
| | | ३ | महाविद्यालये व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी सर्व नोंदवह्या अंतिम नोंदी घेऊन अद्ययावत करणे व लेखापरीक्षणासाठी तयार ठेवणे. |

एन-६९५(१०००-११-०३)-४अ

## छाननी - मंजूरी आदेश (Time Bound Programme )

अर्जाची छाननी करणे - अर्जाची छाननी करताना महाविद्यालयाने केंद्र शासनाने भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या नियमावलीमध्ये सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांकडून भरुन घ्यावयाच्या अर्जाचा नमूना सोबत परिशिष्ट प्रमाणे असेल. सदर अर्ज भरुन घेताना खालील बाबींवर विशेष लक्ष देण्यात यावे :-

१ विद्यार्थ्याचे नाव व पत्ता
२ पालकांचे वार्षिक उत्पन्न
३ विद्यार्थ्याची जन्म तारिख
४ विद्यार्थ्याची जात व पोट जात
५ मागील वर्षी उत्तीर्ण झाला आहे काय
६ मागील वर्षी अर्ध्यातूनच शिक्षण सोडले आहे काय.
७ महाविद्यालयात प्रत्यक्ष त्याने केव्हा प्रवेश घेतला आहे.
८ सदरचा विद्यार्थी वसतीगृहात राहतो किंवा कसे
९ विद्यार्थी बाहेरच्या जिल्ह्यातून बदलून आला आहे किंवा कसे
१० विद्यार्थी दोन अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला आहे किंवा कसे
११ विवाहीत असल्यास पती / पत्नीचे उत्पन्न

---